डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
कृषि नगर, अकोला ४४४ ००१

विषय: - नागपूर विभाग पदवीधर व अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक-२०२६ मतदानासाठी ४ तासाची विशेष नैमित्तिक सवलत / रजा मंजूर करण्याबाबत.

संदर्भ: - १) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. अ.आ(सा.प्र.)/जी.बी.४/शिक्षकविड प्रक्र३४६/२०२६ दि. १९/१०/२०२६

२) महाराष्ट्र शासन, सा.प्र. विभाग यांचे पत्र क्र. बीआयई/२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/निं-१ दि. १६/१०/२०२६

परिपत्रक:-

जा.क्र साप्रवि /शिक्षकनिवड/मतदान/2852 /२०२६ दिनांक २१/१०/२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाने नागपूर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.सदर निवडणुकीचे मतदान दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० या वेळेत होणार आहे.

या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विद्यापीठातील जे अधिकारी हे मतदार म्हणून नोंदणीकृत आहेत, त्यांना शासन निर्देशानुसार २ तासांची विशेष सवलत देण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कार्यरत असलेल्या व नागपूर पदवीधर / अमरावती शिक्षक मतदारसंघाचे मतदार असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दि. २३/१०/२०२६ रोजी 2 तासांची विशेष सवलत देण्यात येत आहे.

ही सवलत केवळ मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांनाच अनुज्ञेय राहील.

करीता सर्व संबधितांनी याची नोंद घ्यावी. सोबत संदर्भीय पत्राची प्रत संलग्न करण्यात येत आहे.

सहायक कुलसचिव (साप्रवि.)
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)----------
४. विभाग प्रमुख (सर्व)---------- डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. सहयोगी संशोधन संचालक, विभागीय संशोधन केंद्रे यवतमाळ / सिंदेवाही
६. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------
७. कार्यालय प्रमुख, अ.भा.सं. प्रकल्प (सर्व) ----------
८. प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय, (सर्व) ----------
९. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्रे (सर्व) ----------
१०. वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्रे (सर्व) ----------
११. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यार्थी कल्याण अधिकारी. पं.दे.कृ. वि., अकोला.
१२. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.
१३. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
१४. प्रभारी अधिकारी, माहिती व संप्रेषण केंद्र यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर तात्काळ प्रकाशित करावे.

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त यांचे कार्यालय अमरावती
बायपास रोड, कॅम्प, अमरावती -444 602
दूरध्वनी 0721-2662062 / 2552923 फॅक्स 0721- 2662782
ईमेल – dcg_amravati@rediffmail.com वेबसाईट : http://amravatidivision.gov.in

क्रः अ.आ(सा.प्र.)/जी.बी.४/शिक्षक निवड/प्र.क्र. ३४६ /२०२६ दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६

निवडणूक/महत्वाचे- सुधारीत

प्रति,

१. जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
अमरावती/अकोला/यवतमाळ/वाशिम/ बुलढाणा.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,
अमरावती/अकोला/यवतमाळ/वाशिम/ बुलढाणा.
३. आयुक्त , महानगर पालिका, अमरावती / अकोला
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती
५. सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण अमरावती विभाग, अमरावती
६. सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक विभाग, अमरावती
७. उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला
८. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
९. कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
१०. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती
११. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग अमरावती
१२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , अमरावती / अकोला / यवतमाळ / बुलढाणा / वाशिम

5457

विषय :- **शिक्षक मतदारसंघाची व्दिवार्षिक निवडणूक-२०२६**
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत..

संदर्भ :- १. उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र.बीआयई-२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१ दिनांक ०१.१०.२०२६
२. अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.बीआयई/२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१ दि.१६.१०.२०२६

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० या वेळेत होणाऱ्या मतदानासाठी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, याकरिता दोन तासांची विशेष सवलत देण्याबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भ क्र. २ अन्वये सदर निवडणुकीच्या मतदान केंद्रांचे अंतर काही ठिकाणी अधिक असल्यामुळे मतदानासाठी प्रवास करण्यास जास्त वेळ लागत असल्याची बाब विचारात घेऊन, खाजगी आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी दोन तासांऐवजी चार तासांची विशेष सवलत देण्याबाबत आवश्यक सूचना देण्याचे तसेच सदर बाबीस व्यापक प्रसिद्धी देण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

Estt./Comm./Exam./Gad.
22/10/26

O/o Registrar
No. R/573
Date 22/10/26
Dr. P.D.K.V., AKOLA

REGISTRAR OFFICE
DR. P.D.K.V., AKOLA
22 OCT 2026
In. No. 524

त्याअनुषंगाने अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संदर्भिय पत्रातील निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, खाजगी आस्थापनांमधील संबंधित मतदारांना चार तासांची विशेष सवलत देण्याबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

सहपत्र:-वरीलप्रमाणे

(अर्चना गुंडे)
विभागीय आयुक्त तथा
निवडणूक निर्णय अधिकारी
अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : बीआयई /२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/ नि-१
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२६.
Email:conduct-election@mah.gov.in

प्रति,

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ व
अमरावती विभाग व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ.

विषय :- ३ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत....

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र समक्रमांक व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या पत्रान्वये औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभागाच्या पदवीधर तसेच अमरावती विभाग व पुणे विभाग या विभागाच्या शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ८.०० ते सायं. ४.०० या कालावधीत होणाऱ्या मतदानासाठी २ तासांची विशेष सवलत देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तथापि, सदर निवडणूकीच्या मतदान केंद्राचे अंतर काही ठिकाणी अधिक असल्याने प्रवास करण्यासाठी जास्त वेळ जातो. त्यामुळे सदर निवडणुकीकरीता मतदार असणाऱ्या खाजगी आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदान करण्यासाठी २ ऐवजी ४ तासांची विशेष सवलत देण्याबाबत विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या स्तरावरुन खाजगी आस्थापनांना सूचना देण्यात याव्यात. तसेच या बाबींना व्यापक प्रसिद्धी ही देण्यात यावी ही विनंती.

आपला

(सुनील सोनार)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत:- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
(औरंगाबाद, पुणे, नागपूर व अमरावती विभागातील जिल्हे)